## थोडक्यात



### कराटे स्पर्धेत साईराम विभागीय स्तरावर

**नाशिक ।** महिरावणी येथील मातोश्री गीताबाई देवराम पाटील माध्यमिक विद्यालयाचा साईराम नाना व्यवहारे याने जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत विभागीय स्तरासाठी निवड झाली आहे. विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक संजय पवार, समाधान शेवाळे, देवेंद्र देवरे, संजय गायकवाड, सुरेखा भामरे(आहेर), दीपाली वाडीले, अश्विनी चौरे, अतुल कुलथे, दिलीप खांडबहाले, विलास येवले आदींनी शुभेच्छा दिल्या आहेत.

### न्यूझीलंड संघ जाहीर

**नवी दिल्ली ।** न्यूझीलंड विरूध्द ऑस्ट्रेलिया क्रिकेट संघांमध्ये ३ टी-२० सामन्यांची मालिका खेळविण्यात येणार आहे. १ ऑक्टोबरपासून ही मालिका खेळविण्यात येणार आहे.या मालिकेसाठी न्यूझीलंड संघाची घोषणा करण्यात आली. संघाचा नियमित कर्णधार मिचेल सँटनेर दुखापतीमुळे बाहेर झाला आहे. तसेच माजी कर्णधार केन विल्यम्सन देखील या मालिकेत खेळणार नसल्याचे त्याने स्पष्ट केले आहे. आता संघाची कमान मायकेल ब्रेसवेल कडे असणार आहे. **न्यूझीलंड संघ :** मार्क चॅपमन, मायकेल ब्रेसवेल, डेव्हिन कॉनवे, जेकब डफी, जॅक फाऊलकेस, बेवॉन जेकब्स, जेकब डफी, मॅट हेन्री टीम रॉबिनसन, डॅरेल मिचेल, रचीन रवींद्र, बेन सियर्स, ईश सोधी, काईल जेमिसन आणि टीम सॅफरिट.

# नीरजचे ऐतिहासिक प्रदर्शन

## वर्ल्ड चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत दिमाखात प्रवेश

**टोकियो । वृत्तसंस्था**

भारताचा स्टार भालाफेकपटू, नीरज चोप्राने वर्ल्ड अ‍ॅथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२५ च्या अंतिम फेरीत दिमाखात प्रवेश केला आहे. विशेष म्हणजे, टोकियो ऑलिंपिकप्रमाणेच त्याने पुन्हा एकदा एकाच प्रयत्नात पात्रता मिळवून सर्वांना थक्क केले. त्याने ८४.८५ मीटर लांब भाला फेकत, ८४.५० मीटरचा पात्रता निकष सहज पार केला. ग्रुप 'ए' मधील १९ स्पर्धकांपैकी तो एकमेव होता, ज्याने पहिल्याच प्रयत्नात अंतिम फेरीतील आपले स्थान निश्चित केले

ग्रुप 'बी' मधून ऑलिम्पिक विजेता अर्शद नदीम याला मात्र अंतिम फेरीपर्यंत पोहोचण्यासाठी तीन प्रयत्न करावे लागले. त्याने पहिल्या दोन प्रयत्नात अनुक्रमे ७६.९९ मीटर आणि ७४.१७ मीटर अंतर गाठले. मात्र, तिसऱ्या आणि शेवटच्या प्रयत्नात त्याने ८५.२८ मीटरचा थ्रो करत अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले.

वर्ल्ड चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत नीरजसोबत सचिन यादवदेखील पात्र ठरला आहे. सचिनने ८३.६७ मीटरचा सर्वोत्तम थ्रो करत, १२ सर्वोत्तम खेळाडूंच्या यादीत स्थान मिळवले. मात्र, यश वीर सिंग आणि रोहित यादव हे इतर दोन भारतीय खेळाडू पात्र ठरू शकले नाहीत.

नीरज चोप्रा पुन्हा एकदा टोकियोत परतला आहे, जिथे त्याने २०२१ मध्ये ऑलिम्पिक सुवर्णपदक जिंकले होते. आता भालाफेक स्पर्धेतील पात्रतेचा टप्पा पार करून, तो उद्या याच मैदानावर अंतिम फेरीसाठी उतरेल.नीरज चोप्रा ग्रुप 'ए मध्ये जर्मनीचा ज्युलियन वेबर, जकुब वदलेच आणि केशॉर्न वॉलकॉट यांच्यासोबत होता. तर, पाकिस्तानचा ऑलिंपिक विजेता अर्शद नदीम ग्रुप बी मध्ये अँडरसन पीटर्स आणि ज्युलियस येगो यांच्यासोबत होता.

### मानाच्या पदकासाठी प्रयत्नशील

नीरज चोप्रा आपल्या पदकांच्या संग्रहात आणखी एक मानाचे पदक मिळवण्यासाठी प्रयत्नशील आहे. त्याच्याकडे टोकियो २०२१ मधील ऑलिम्पिक सुवर्ण आणि पॅरिस २०२४ मधील ऑलिंपिक रौप्यपदकासह, बुडापेस्ट २०२३ मधील वर्ल्ड अ‍ॅथलेटिक्स चॅम्पियनशिपचे सुवर्ण आणि ओरेगॉन २०२२ चं रौप्यपदक आहे. २०२५ मध्ये त्याने दोहा डायमंड लीगमध्ये ९०.२३ मीटरचा थ्रो करून पहिल्यांदा ९० मीटरचा टप्पा पार केला आहे.




# भारतीय संघाचा बोलबाला

## आयसीसी टी-२० क्रमवारी: वरुण, अभिषेक, कुलदीप अव्वल

**मुंबई । वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा मिस्ट्री फिरकी गोलंदाज वरुण चक्रवर्तीने २०२५ मध्ये भारतीय क्रिकेट संघाकडून चमकदार कामगिरी केली आहे. त्यामुळे आयसीसी टी-२० क्रमवारीत तो अव्वलस्थानी विराजमान झाला आहे. विशेष म्हणजे जसप्रीत बुमराह, बिश्नोईनंतर वरुण हा बहुमान तिसरा भारतीय गोलंदाज ठरला आहे.न्यूझीलंड संघाचा गोलंदाज जेकब डफिला पिछाडीवर टाकून तो क्रमवारीत पहिल्या स्थानावर आला आहे.

वरुण चक्रवर्तीने आपल्या टी-२० कारकिर्दीत दुसऱ्यांदा ५ गडी बाद करण्याचा पराक्रम केला आहे.आयसीसीने जाहीर केलेल्या ताज्या क्रमवारीनुसार



वरूण चक्रवर्ती पहिल्या तसेच न्यूझीलंडचा जेकब डफी, वेस्ट इंडिजचा अकिल हुसेन आणि ऑस्ट्रेलियाचा ॲडम झम्पा अनुक्रमे दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या स्थानावर आहे. संघाचा फिरकी गोलंदाज आदिल रशीद पाचव्या आणि श्रीलंका संघाचा नुवान तुषारा सहाव्या स्थानावर आहे. विशेष म्हणजे आयसीसीने जाहीर केलेल्या ताज्या क्रमवारीत वरूण चक्रवर्ती आणि बिश्नोई हे दोन भारतीय फिरकी गोलंदाज अव्वल १० मध्ये आहेत. अफगाणिस्तान संघाचा फिरकी गोलंदाज रशीद खान दहाव्या स्थानावर आहे.

अभिषेक शर्मा फलंदाजीत अव्वल स्थानावर आहे. त्याने १४ सप्टेंबर रोजी ३१ धावांची खेळी खेळली. सलामीवीर फिल दुसऱ्या स्थानावर आणि जोस बटलर तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. दक्षिण आफ्रिकेचा दोन स्थानांनी पुढे सरकला आहे आणि १० स्थानांनी पुढे सरकला आहे आणि ३० व्या स्थानावर पोहोचला आहे.

हार्दिक पांड्या टी-२० आंतरराष्ट्रीय अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीत अव्वल स्थानावर आहे. फिरकी गोलंदाज कुलदीप यादव १६ व्या स्थानांनी झेप घेऊन २३ व्या स्थानावर पोहोचला आहे. आशिया कप पहिल्या सामन्यात कुलदीपने यूएईविरूद्ध २.१ षटकांत ७ धावा देत ४ बळी घेतले. त्याने पाकिस्तानविरूद्ध ४ षटकांत १८ धावा देत ३बळी घेतले. दोन्ही सामन्यांमध्ये कुलदीपला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले.

## भारताचा ऑस्ट्रेलियावर १०२ धावांनी विजय

**चंदीगड । वृत्तसंस्था**

भारतीय महिला क्रिकेट संघाने दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात ऑस्ट्रेलियाचा १०२ धावांनी पराभव करत, तीन सामन्यांच्या मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली. तब्बल १८ वर्षांनंतर भारतीय संघाने ऑस्ट्रेलियाला मायदेशी पराभूत करण्याचा पराक्रम केला.

या सामन्यात ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करताना सर्वबाद २९२ धावा केल्या. यामध्ये सलामीवीर स्मृती मानधनाने शानदार ११७ धावांची खेळी साकारली. हे तिचे एकदिवसीय क्रिकेटमधील १२ वे शतक होते. तिला दीप्ती शर्मा (४०), प्रतिका रावल (२५), आणि रिचा घोष (२९) यांनी चांगली साथ दिली.प्रत्युत्तरात, २९३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचा संघ १९० धावांवर गारद झाला. ऑस्ट्रेलियाकडून अनाबेल सदरलँड (४५) आणि एलिस पेरी (४४) यांनी थोडा प्रतिकार केला. भारताकडून क्रांती गौडने सर्वाधिक ३ बळी घेतले, तर दीप्ती शर्माने २ बळी मिळवले.स्मृती मानधनाला तिच्या शतकी कामगिरीसाठी सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले. आता मालिकेतील तिसरा आणि निर्णायक सामना लवकरच खेळला जाईल.

# पाकिस्तानचा यूएईवर ४१ धावांनी विजय

**दुबई । वृत्तसंस्था**

आशिया चषक २०२५ स्पर्धेत पाकिस्तानने संयुक्त अरब अमिराती (यूएई) संघावर ४१ धावांनी विजय मिळवला.

प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानच्या संघाची सुरुवात खराब झाली. मात्र, सलामीवीर फखर जमानने ५० धावांची अर्धशतकी खेळी करून संघाला सावरले. त्यानंतर शाहीन आफ्रिदीने अवघ्या १४ चेंडूत २९ धावांची शानदार नाबाद खेळी केली. यामुळे पाकिस्तानने २० षटकांत ९ गडी गमावून १४६ धावांपर्यंत मजल मारली. यूएईकडून जुनैद सिद्दीकीने १८ धावांत ४ बळी घेतले, तर सिमरनजीत सिंगने २६ धावांत ३ बळी घेत पाकिस्तानच्या फलंदाजीला खिंडार पाडले.



आशिया चषक २०२५

१४७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना यूएईचा संघ सुरुवातीपासूनच दबावाखाली दिसला. त्यांचे फलंदाज नियमित अंतराने बाद होत गेले आणि त्यांना १७.४ षटकांत सर्व गडी गमावून १०५ धावाच करता आल्या. पाकिस्तानच्या गोलंदाजांनी उत्कृष्ट कामगिरी करत यूएईच्या फलंदाजांना लक्ष्य गाठण्यापासून रोखले.



# गाझियाबादमध्ये दोघांचा एन्काऊंटर

## दिशा पटनीच्या घरावरील गोळीबार प्रकरणात आरोपींचा हात

**लखनौ । वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशातील बरेली येथे अभिनेत्री दिशा पटनीच्या घरावर गोळीबार करणाऱ्या दोन आरोपी चकमकीत ठार झाले. रविंद्र आणि अरुण अशी या दोन्ही आरोपींची ओळख आहे. एसटीएफच्या कारवाईत गाझियाबादच्या ट्रॉनिका सिटी येथे या आरोपींचे एन्काउंटर झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपींचे रोहित गोदारा-गोल्डी बरार टोळीशी संबंध असल्याचे बोलले जात आहे. एसटीएफच्या पथकाने घटनास्थळावरून ग्लॉक, जिगाना पिस्तूल आणि मोठ्या प्रमाणात काडतुसे जप्त केली आहेत. दरम्यान, १२ सप्टेंबरला पहाटेच्या सुमारास बरेलीच्या सिव्हिल लाइन्स परिसरात दिशा पटनीच्या घरावर दोन अज्ञात बाइकस्वार गुंडांनी ८-१० राऊंड गोळीबार केला होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा गोळीबार पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास झाला होता. मात्र, या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाव्हती.

बरेलीमध्ये १२ सप्टेंबरच्या पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास दिशा पटनीच्या घरावर झालेल्या गोळीबाराने संपूर्ण शहरात खळबळ उडाली होती. पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला होता. त्यांनी सर्व सीसीटीव्ही फुटेज तपासले आणि संशयास्पद मार्गांची तपासणी केली. याच बरोबर, शेजारील राज्यांच्या गुन्हेगारी रेकॉर्डशी तुलना करून या दोन्ही गुन्हेगांची ओळख पटली. तपासादरम्यान, रविंद्र हा रोहतकचा तर अरुण हा सोनीपतचा रहिवासी असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. हे दोघे या घटनेत सामील होते.

# हा नवा भारत धमक्यांना घाबरत नाही

## पंतप्रधान मोदी यांचा पाकिस्तानवर हल्लाबोल

**धार, मध्य प्रदेश । वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल मध्य प्रदेशातील धार येथे विविध विकासकामांची पायाभरणी आणि उद्घाटन केले. याप्रसंगी, त्यांनी पाकिस्तानवर जोरदार टीका करत 'हा नवा भारत आहे, जो कोणाच्याही अणुयुद्धाच्या धमक्यांना घाबरत नाही आणि दहशतवाद्यांच्या तळांवर थेट हल्ला करून प्रत्युत्तर देतो,' असे ठणकावून सांगितले.

भाषणाच्या सुरुवातीलाच पंतप्रधान मोदींनी पाकिस्तानच्या दहशतवादी कारवायांवरून टीका केली. पाकिस्तानातून आलेल्या दहशतवाद्यांनी आमच्या भगिनी आणि मुलींचे सिंदूर उद्ध्वस्त केले. मात्र, आम्ही 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून त्यांचे दहशतवादी अड्डे नष्ट केले. आमच्या शूर सैनिकांनी पाकिस्तानला क्षणार्धात गुडघे



टेकायला भाग पाडले, असे ते म्हणाले. त्यांनी नुकत्याच एका पाकिस्तानी दहशतवाद्याने रडत रडत आपली कहाणी सांगितल्याचाही उल्लेख केला. मोदींनी स्पष्ट केले की, हा नवा भारत आहे, जो कोणत्याही धमक्यांना घाबरत नाही.

पंतप्रधानांनी १७ सप्टेंबर या दिवसाचे महत्त्व अधोरेखित केले. 'आजचा दिवस सरदार पटेल यांच्या पोलादी निश्चयाचा साक्षीदार आहे. याच दिवशी भारतीय लष्कराने हैदराबादला अनन्वित अत्याचारातून मुक्त करून भारतात समाविष्ट केले,' असे सांगत त्यांनी या ऐतिहासिक कामगिरीसाठी सशस्त्र दलांच्या शौर्याला आदराने वंदन केले. हैदराबाद मुक्ती दिन साजरा करण्याचा निर्णय घेऊन सरकारने योग्य सन्मान दिल्याचेही त्यांनी नमूद केले. हा दिवस भारतमातेचा सन्मान आणि अभिमान सर्वात महत्त्वाचा आहे, याची आठवण करून देतो असे ते म्हणाले.

**नवीन योजनांचा शुभारंभ**

पंतप्रधान मोदींनी याप्रसंगी 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' मोहीम सुरू केली. देशाची नारीशक्ती, युवाशक्ती, गरीब आणि शेतकरी हे विकसित भारताच्या प्रवासाचे चार आधारस्तंभ आहेत, असे त्यांनी सांगितले. तसेच, विश्वकर्मा जयंतीनिमित्त त्यांनी कारागिरांना अभिवादन केले आणि 'आदी सेवा पर्व' सुरू करण्याची घोषणा केली. पंतप्रधानांनी धार येथे भारतातील सर्वात मोठ्या एकात्मिक वस्त्रोद्योग पार्कची पायाभरणी केली. 'हा प्रकल्प वस्त्रोद्योगाला नवीन ऊर्जा देईल, शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनासाठी चांगला भाव मिळेल आणि मोठ्या संख्येने तरुणांना रोजगार मिळेल,' असे सांगत त्यांनी या प्रकल्पाचे महत्त्व स्पष्ट केले.

# ईव्हीएमवर आता उमेदवाराचा फोटो अन् मोठे नाव

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**निवडणूक आयोगाचा निर्णय**

आगामी बिहार विधानसभा निवडणुकीपासून मतदान यंत्रांमध्ये मोठे बदल करण्यात येणार आहेत. मतदारांची सोय लक्षात घेऊन निवडणूक आयोगाने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यापुढे मतदान यंत्रावर उमेदवाराच्या नावाशेजारी त्याचे रंगीत छायाचित्र असेल. त्याचबरोबर, उमेदवाराचे नावही मोठ्या अक्षरात छापले जाणार आहे, जेणे करून मतदारांना उमेदवाराची ओळख पटवणे अधिक सोपे जाईल.

मतदान यंत्रावरील जुन्या पद्धतीत उमेदवाराचे नाव, पक्षाचे चिन्ह आणि पक्षाचे नाव असे तीनच घटक असायचे. अनेकदा एकाच नावाचे अनेक उमेदवार रिंगणात असल्यामुळे मतदारांमध्ये संभ्रम निर्माण होत असे.यामुळे मतदारांना योग्य उमेदवाराची निवड करताना अनेक अडचणी येत होत्या.निवडणूक आयोगाने या समस्येवर तोडगा म्हणून मतदान यंत्रामध्ये उमेदवाराचे रंगीत छायाचित्र लावण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे मतदारांना फक्त नाव वाचूनच नाही, तर उमेदवाराचा चेहरा पाहूनही योग्य उमेदवाराला मतदान करणे शक्य होईल. यामुळे मतदानाची प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि सोयीची होईल.

हा नवा बदल सर्वप्रथम बिहारमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत लागू करण्यात येईल. निवडणूक आयोग या बदलांसाठी विशेष मतदान यंत्रांची निर्मिती करत आहे. या यंत्रांमध्ये उमेदवाराच्या माहितीसाठी अतिरिक्त जागा दिली जाईल, जिथे त्याचे छायाचित्र आणि मोठे नाव दिसेल.

# बनावट प्रमाणपत्रे मिळवणाऱ्यांची चौकशी करणार

## चंद्रशेखर बावनकुळे यांचा इशारा

**पुणे । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणामुळे ओबीसी आणि अठरापगड जातींवर कुठलाही अन्याय होणार नाही, याची आम्ही हमी घेतली आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे प्रमाणपत्रे मिळवणाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी येथे दिला.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'सेवा पंधरवडा' कार्यक्रमानंतर ते बोलत होते. मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर ओबीसी समाजात निर्माण झालेल्या चिंतेवर बावनकुळे यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, की मंत्री छगन भुजबळ यांनी कॅबिनेट उपसमितीसमोर १५ ते २० बनावट कागदपत्रे सादर केली आहेत. जे मराठा-कुणबी आहेत, त्यांना प्रमाणपत्र मिळेल आणि पूर्ण संरक्षण दिले जाईल. पण चुकीच्या पद्धतीने प्रमाणपत्र घेणाऱ्यांची संपूर्ण चौकशी केली जाईल. कोणताही तहसीलदार किंवा प्रांत अधिकारी खोटे प्रमाणपत्र देणार नाही, याची सरकारने खबरदारी घेतली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात पहिल्यांदा ओबीसी मंत्रालय आणि महाज्योतीसारखी संस्था दिली, उद्धव ठाकरे सरकारच्या काळात गेलेले ओबीसींचे राजकीय आरक्षण परत मिळवून दिले. त्यांच्याविरोधात घोषणाबाजी करणे योग्य नाही, असे सुनावत त्यांनी फडणवीसांचा 'देवदुर्लभ' नेतृत्व असा उल्लेख केला.

### पवारांनी काय केले ते सांगा

राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांच्याबद्दल बोलताना ते म्हणाले, की शरद पवारांनी महाराष्ट्रात कधीही कुठल्या समाजाचे भले करण्याची भूमिका घेतली नाही. त्यामुळे त्यांनी जातीय उपसमित्यांवर बोलू नये. देवेंद्र फडणवीस यांनीच मराठा आणि ओबीसी समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी कॅबिनेट उपसमित्या तयार केल्या, ज्यामुळे 'सारथी' सारख्या संस्था उभ्या राहिल्या. पवारांनी काय केले ते सांगा, असा टोला त्यांनी लगावला.

# मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्याची विटंबना

**मुंबई । प्रतिनिधी**

**दादरमध्ये तणाव**

दादरच्या शिवाजी पार्क येथील माँसाहेब मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्यावर रंग फेकून विटंबना करण्याचा खोडसाळपणा मंगळवारी उघडकीस आला. हे वृत्त वाऱ्यासारखे पसरताच शिवसैनिक आणि मनसैनिकांनी शिवाजीपार्क परिसरात धाव घेऊन पुतळ्याची तसेच परिसराची स्वच्छता केली. दरम्यान, या घटनेमुळे दादरमध्ये तणाव निर्माण झाला होता. परंतु, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थितीवर ताबा मिळवला. तसेच, पोलिसांकडून अनोळखी आरोपीचा शोध सुरु आहे. दरम्यान,उद्धव आणि राज ठाकरेंकडून परिसराची पाहणी केली.

शिवाजी पार्क परिसरात नेहमीप्रमाणे नागरिक मॉर्निंग वॉक करीत असताना माँसाहेब मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्यावर लालरंग फेकल्याची घटना समोर आली. या घटनेनंतर उद्धव ठाकरे गटाचे खासदार अनिल देसाई, आमदार महेश सावंत, माजी महापौर किशोरी पेडणेकर, महादेव देवळे, उपनेत्या विशाखा राऊत, विभागप्रमुख, शाखाप्रमुख तसेच कार्यकर्त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच, मनसे नेते बाळा नांदगावकर, अविनाश अभ्यंकर आदी नेतेमंडळी उपस्थित होते. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन शिवसैनिकांनी त्वरित पुतळ्याची साफसफाई केली.

दरम्यान, या घटनेबद्दल उद्धव ठाकरे यांनी संताप व्यक्त केला आहे. कालचा निंदनीय प्रकार घडला असून ते करणाऱ्या दोनच वृत्ती असू शकतात. एक म्हणजे ज्यांना आपल्या आई-वडिलांचे नाव घ्यायला लाज वाटते अशा लावारिस, बेवारस माणसाचे हे कृत्य असेल. किंवा बिहारमध्ये मोदीजींच्या मातोश्रीचा अपमान झाला. त्यामुळे बिहार बंद करण्याचा जो असफल प्रयत्न झाला, असाच कुणाचा तरी महाराष्ट्र पेटवण्याचा हा उद्योग असू शकतो, असा आरोप ठाकरेंनी केला.

देशदूत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि. यांच्याकरिता प्लॉट क्र. बी ६४, नाईस, सातपूर, नाशिक - ४२२००७ येथे मुद्रित करून देशदूत कार्यालय, कॉंग्रेस हाऊस, म.गांधी रोड, नाशिक येथे प्रसिद्ध केले.
● संपादक : **हेमंत दिनेश अलोने.** ● सल्लागार संपादक : *** शैलेंद्र माणिकराव तनपुरे** (* पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) ✆ : शहर- ०२५३-२५७५७१६, २५७२४०० ● नाशिकरोड कार्यालय :०२५३-२९४२२०३
● मालेगाव कार्यालय फोन: ०२५५४-२९९२०३ ● सिन्नर फोन: ०२५५१-२९९२०३, ● दिंडोरी फोन : ०२५५७-२२२८८८ ● निफाड फोन : ०२५५७-२९९६९६. ● Mail id : ceditor@deshdoot.com